॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना इंटर्नशिप संदर्भात माहिती मिळण्याकरीता इंटर्नशिप पोर्टलचा शुभारंभ व्यवस्थापन परिषद सदस्य नंदकुमार बेंडाळे यांच्या हस्ते आज दि. १५ एप्रिल रोजी करण्यात आला.

यावेळी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, प्रा. शिवाजी पाटील, ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्राचार्य संजय सुराणा, प्रा. म.सु. पगारे, डॉ. पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पालवे, प्राचार्य जगदीश पाटील, प्राचार्य एस.एस. राजपूत, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रा. योगेश पाटील, सीए रवींद्र पाटील हे उपस्थित होते.

राज्य शासनाने नवे शैक्षणिक धोरण २०२० लागू केले असून त्याची अंमलबजावणी विद्यापीठाने केली आहे. या धोरणा अंतर्गत विद्यार्थ्यांना इंटर्नशिप करणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतील प्रा. मनोज पाटील व पध्दती विश्लेषक डॉ. दाऊदी हुसेन यांनी या इंटर्नशिप पोर्टलची निर्मिती केली आहे. या पोर्टलवर उद्योजक यांनी त्यांच्या उद्योग व व्यवसायाची माहिती भरून नोंदणी करावयाची आहे. विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थ्यांनी या पोर्टलवर प्रशाळेमार्फत नोंदणी करावयाची आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना इंटर्नशिपचे पर्याय उपलब्ध होणार आहेत. ही सुविधा प्राथमिक स्वरूपात विद्यापीठातील प्रशाळेतील विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेअंतर्गत संशोधक विद्यार्थी डॉ. गौरी बिसन-घोष (भौतिकशास्त्र प्रशाळा), मंगल चौधरी, जितेंद्र साळुंखे (जैवशास्त्र प्रशाळा), डॉ. पवन बाविस्कर, स्वाती गोसावी, विकास पाटील, मयुरी पाटील(रसायनशास्त्र प्रशाळा) यांना रिसर्च पब्लीकेशन ॲवार्ड तर विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेतील मयुर पेंढारकर या संशोधक विद्यार्थ्यास पेटंट पब्लीकेशन ॲवार्ड जाहीर झाला आहे.

कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या संकल्पनेतून व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशाळांमध्ये पूर्णवेळ संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेअंतर्गत रिसर्च पब्लिकेशन ॲवार्ड, पेटंट पब्लिकेशन ॲवार्ड आणि पेटंट ग्रँट ॲवार्ड ही योजना प्रथमच सुरु करण्यात आली आहे. या योजनेच्या अनुषंगाने दि. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील संशोधन कार्याबद्दल वरील पुरस्कारांकरीता प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या प्रस्तावांमधून गठीत केलेल्या समितीने वरील विद्यार्थ्यांची निवडीची शिफारस केली होती. रिसर्च पब्लीकेशन ॲवार्ड अंतर्गत रूपये ५०००/- व प्रमाणपत्र तर पेटंट पब्लीकेशन ॲवार्ड अंतर्गत रूपये २०००/- व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

.................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक:१५ एप्रिल, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

कुलसचिव